जानेवारी 2016 | ₹ 40 | पृष्ठ संख्या 36 | पुणे, वर्ष 6 | अंक 01

# अर्थपूर्ण

आर्थिक साक्षरता +
पारदर्शकता =
स्वाभिमानी भारत

- अनर्थ थांबविण्यासाठी 'अर्थक्रांती'
- गुंतवणूक : मानसिकता हवी
- नोटा, चिल्लरच्या युगाला घरघर?

LBT

GST

BTT

जीएसटी फसो आणि

## बीटीटी

चर्चेत येवो

आदर्श करपद्धती याचा अर्थ समता, उत्पादकता, सोपेपणा, निश्चितता, लवचिकता, आणि किफायतशीरता या तत्त्वांचे पालन करणारी करपद्धती. या तत्त्वांचा विचार करता जीएसटी हे एक पुढचे पाऊल म्हणून ठीकच आहे, पण या तत्त्वांचे पालन करणारा अर्थक्रांतीने सुचविलेला बीटीटी हा एकच कर, हेच त्याचे खरे उत्तर आहे.

संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
सम्राट शिरवळकर

व्यवस्थापक
अशोक तुळपुळे

संपर्क : editor.arthapurna@gmail.com, 9860580147

'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.
11, 'हर्षदा', रामबाग कॉलनी,
पौड रोड, पुणे 411038
फोन : 020-25430540,
www.arthapurna.org

# अर्थपूर्ण

जानेवारी 2016

वर्ष सहावे
अंक पहिला

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्, पुणे.
9881098010

**व्यवस्थापन साहाय्य**
महेंद्र बनसोडे

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी**
व्यवहारासाठी संपर्क
020-25430540
9921926538
arthapurna.monthly@gmail.com

**जाहिरात संपर्क**
राजन मिडिया स्टेशन
9922920765
अर्चना जोशी
9552591874

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. 31, 34 पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-702, साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे 411038 (सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले.
संपादक : यमाजी मालकर

## अनुक्रमणिका

04 **काहींना कळले आणि त्यातले काही वळले...**यमाजी मालकर
06 **जीएसटी फसो आणि बीटीटी चर्चेत येवो...**यमाजी मालकर
09 **अर्थभान**
15 **अनर्थ थांबविण्यासाठी 'अर्थक्रांती'...**हेमंत देसाई
18 **नोटा, चिल्लरच्या युगाला घरघर?...**मुजफ्फर हुसेन
21 **अर्थक्रांती न्यूज**
23 **अर्थक्रांती प्रतिसाद**
24 **अर्थक्रांतीच का?**
27 **अर्थक्रांतीचा ठसा**
31 **गुंतवणूक : मानसिकता हवी ...**प्रशांत बने
34 **तेच म्हणतात...**

## भूमिका




# काहींना कळले आणि त्यातले काही वळले



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**निष्क्रिय गुंतवणुकीकडून उत्पादक गुंतवणुकीकडे वळले पाहिजे, असे भारतीय समाजाला आज वाटायला लागले आहे तसेच अर्थक्रांतीचेही होईल. सध्याची लपवाछपवीवर आधारित असलेली आणि खोटा व्यवहार करायला लावणारी करव्यवस्था, त्यामुळे लाचार झालेले सरकार, रोखीचे व्यवहार वाढविणाऱ्या अधिक मूल्यांच्या नोटा आणि अशा अस्वच्छ व्यवस्थेचे आपल्या आयुष्यावर होणारे परिणाम सर्वसामान्य माणसाला कळतील आणि तेच शांत, प्रामाणिक, समृद्ध आणि स्वाभिमानी जीवनासाठी अर्थक्रांतीचा पुरस्कार करतील.**

आपण घर खूप छान बांधले आणि परिसर मात्र अजिबात चांगला नाही किंवा आपण गाडी खूप भारी घेतली पण ती चालवायला रस्ताच नाही, तर घरात राहण्याचे आणि गाडी घेण्याचे समाधान आपल्याला मिळणार नाही. आज बहुतांश मध्यमवर्गीय भारतीयांची जी अडचण झालेली आहे, ती नेमकी अशी आहे. संपत्तीच्या कोणत्याही निकषात भारत कोठे कमी आहे, असे म्हणण्याची सोय नाही, तरीही आपण अमेरिका आणि पाश्चात्य देशांच्या कितीतरी मागे आहोत,असे आपण मान्य करतो. मग नेमके काय कमी आहे, याचा शोध घेता, एक कळीची गोष्ट लक्षात येते, ती म्हणजे त्या देशांत पैशांचे जेवढे पतसंवर्धन होते, तेवढे आपल्या देशात होत नाही. याचा अर्थ आपल्याकडे पैसा तर भरपूर आहे, संपत्ती तर भरपूर आहे, पण तिचा वापर नीट होत नाही. त्यामुळे आम्ही वैयक्तिक जीवन फार चांगले जगण्याचा प्रयत्न करतो आणि जगतोही पण त्याला चांगल्या सार्वजनिक जगण्याची जोड मिळत नसल्याने आपल्याला जगण्याचे पूर्ण समाधान मिळत नाही.

विकसित देशात पतसंवर्धन होते आणि आपल्या देशात ते तेवढे होत नाही, याची काही उदाहरणे पाहून नेमके काय चुकते आहे, ते समजून घेऊ.

भारत ही दोन ट्रीलीयन डॉलरची आणि जीडीपीचाच विचार करायचा तर जगातील नववी मोठी अर्थव्यवस्था आहे. पण देशाची संपत्ती सोने आणि स्थावर मालमत्तेत अडकली आहे. देशात आज 24 हजार टन (काहींच्या मते 22 हजार टन) म्हणजे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक सोने (चीनमध्ये यापेक्षा अधिक सोने असू शकते.) भारतीय बाळगून आहेत. तर जमीन आणि घरांत भारतीयांनी इतकी गुंतवणूक केली आहे की आता शहरांत घरे विकली जात नाहीत आणि जमिनीचे व्यवहार ठप्प झाले आहेत. सोन्याचे दर खाली खाली जात आहेत. ते वर येण्यासाठी आपल्याला जगात अस्थिरता निर्माण होण्याची वाट पाहावी लागते! वास्तविक हा पैसा जर खेळता असता तर आता देशात फार वेगळे चित्र पाहायला मिळाले असते.

पण आनंदाची बातमी अशी की सोने आणि स्थावर मालमत्तेत पैसा गुंतवून त्याचा पुरेसा परतावा मिळत नाही तसेच तो वापरण्यासाठीची लवचिकता कमी असल्याची जाणीव अधिकाधिक भारतीयांना आता होऊ लागली असून ते आता बँकेच्या मार्फत ज्या प्रकारची गुंतवणूक करता येते, त्याकडे ते वळू लागले आहेत. रिझर्व बँकेच्या आकडेवारीनुसार गेले तीन वर्षे बँकेतील ठेवी, शेअरबाजार, विमा, म्युच्युअल

आणि पेन्शन फंडमधील गुंतवणूक वाढत चालली आहे. या प्रकारची गुंतवणूक 2009-10 या दरम्यान एकूण खर्च करायला उपलब्ध असलेल्या (जीएनडीआय) राष्ट्रीय उत्पन्नाच्या 12 टक्के होती. ती कमी होत 2012 -13ला 7 टक्के इतकी कमी झाली होती, पण ती आता 7.5 टक्के झाली असून तिच्यात पुढील काळात वाढच अपेक्षित आहे. तर दुसरीकडे सोने आणि स्थावर मालमत्तेत 2011-12 ला 14.8 टक्के असलेली गुंतवणूक 2013-14 ला 10.4 टक्क्यांवर उतरली आहे. 2010 साली भारताने 1006 टन सोने आयात केले होते ते 2014 मध्ये 842.7 टन इतके कमी झाले आहे.

आपल्या देशासाठी ही आनंदाची गोष्ट आहे, याचे कारण बँकेतील ठेवी, शेअरबाजार, विमा, म्युच्युअल आणि पेन्शन फंडमधील गुंतवणूक ही उत्पादक गुंतवणूक मानली जाते. स्थावर मालमत्ता आणि सोन्यातील गुंतवणूक ही निष्क्रिय गुंतवणूक मानली जाते. उत्पादक गुंतवणूक ही देशाच्या अर्थरचनेला उपकारक ठरते तर निष्क्रिय गुंतवणूक ही देशासाठी अपायकारक मानली जाते. उत्पादक गुंतवणुकीत देशाला विकास करण्यासाठी देशी भांडवल निर्माण होते तर निष्क्रिय गुंतवणुकीच्या अतिरेकी प्रमाणामुळे आपले भांडवल दीर्घकाळ अडकून पडते आणि आपल्याला विदेशी भांडवलावर अवलंबून राहावे लागते. जसे आपल्या देशाचे सध्या झाले आहे. देशात प्रचंड संपत्ती असून ती फिरत नसल्याने आपले एफडीआयवरील अवलंबित्व वाढले आहे. एवढे की एफडीआय कमी झाली की आपल्या विकासदराला घरघर लागते.

उत्पादक गुंतवणुकीतील पैसा हा आधी बँकांत जातो आणि त्यांच्या मार्फत तो उत्पादक कामासाठी कर्जरूपाने दिला जातो. जेवढा बँकमनी अधिक, तेवढे व्याजदर कमी. अनेक विकसित देशातील व्याजदर हे सहा किंवा त्यापेक्षा कमी आहेत. त्यामुळे त्यांना पैसा माफक व्याजदरात वापरायला मिळतो, पण आपल्या देशात बँकमनी कमी असल्याने बँका सतत भांडवलाच्या शोधात असतात. त्यामुळे आपल्याला घरासाठीही 10 टक्क्यांनी कर्ज घ्यावे लागते. याचा अर्थ घरासाठी घेतलेले कर्ज आपण तब्बल अडीचपट फेडतो. आपल्या देशातील घराचे जे कर्ज 15 वर्षांनी फेडले जाते, ते फेडण्यासाठी विकसित देशात केवळ 7 वर्षे लागतात. म्हणजे स्थावर मालमत्ता आणि सोन्यात अधिक गुंतवणूक करून आपण आपल्याच पायावर कसा धोंडा पाडून घेत आहोत, हे लक्षात यावे.

भारतीय गुंतवणूकदार अलीकडील काही वर्षात पुन्हा उत्पादक गुंतवणुकीकडे का सरकत आहेत, याचे कारण आहे. जेव्हा चलनवाढ अधिक असते, तेव्हा स्थावर मालमत्तेमधील गुंतवणूक फायद्याची ठरते. कारण बँक ठेवीसारख्या गुंतवणुकीतून जो परतावा मिळतो, तो अगदीच किरकोळ किंवा उणे असतो. 2007 ते 2013 ची सुरुवात या काळात तसे झाले. पण त्यानंतर चलनवाढ कमी करण्याचे विशेष प्रयत्न सरकार आणि रिझर्व बँकेने केले आणि हा परतावा 3.56 टक्क्यांच्या घरात पोचल्याने उत्पादक गुंतवणूक वाढू लागली.

सरकारने आणलेली जन धन योजना आणि बँकिंग क्षेत्रात होत असलेल्या तंत्रज्ञानावर आधारित अनेक मोठ्या बदलांचा यात मोठा वाटा आहे. आर्थिक सर्वसमावेशकता, डिजिटल व्यवहारांत होत असलेली वाढ आणि रोखीचे व्यवहार कमी करण्यासाठी सरकार करत असलेल्या प्रयत्नांमुळे बँकमनीच्या साठ्यात चांगलीच वाढ होऊ लागली आहे. डिजिटल व्यवहार वाढावेत यासाठी सरकार सवलतीही देत आहे. उदा. क्रेडीट आणि डेबिट कार्ड वापरणाऱ्यांना तसेच ऑनलाईन व्यवहार करणाऱ्यांना सवलत देणे. सरकारची जी देणी आहेत, ती सर्व बँकेच्या माध्यमातून किंवा डिजिटल मार्गानेच घेणे, असेही प्रयत्न केले जात आहेत. अशाने व्यवहार तर पारदर्शी होतातच, पण त्यासाठी रोख वापरण्याची गरज पडत नाही. रोखीचे व्यवहार कमी झाले पाहिजे, यासाठी सरकार प्रयत्न करते आहे, कारण रोखीचे व्यवहार करणारा देश म्हणून भारत 'आघाडीवर' आहे. ब्राझील आणि मेक्सिकोच्या तुलनेत भारतात होणारे रोखीचे व्यवहार तब्बल चौपट आहेत!

थोडक्यात, पैसा हे विनिमयाचे माध्यम आहे, ती वस्तू नव्हे, याचे आकलन अद्याप बहुतांश भारतीयांना होत नसले तरी तो फिरता, प्रवाही राहण्यात आपले हित आहे, हे त्यांना कळू लागले आहे. ही जाण जसजशी वाढत जाईल, तसतशी उत्पादक गुंतवणूक वाढत जाईल. त्यातून आपले व्यवहार पारदर्शी होतील म्हणजे काळा पैसा तुलनेने कमी होईल. म्हणजे सरकारला कररूपाने चांगला महसूल तर मिळेलच, पण देशी हक्काचे भांडवल उपलब्ध झाल्याने तो पैसा आपल्याच सार्वजनिक सुखसोयी वाढविण्यासाठी उपयोगी ठरेल. कोणतेही विकासकाम का होत नाही, याचे आजचे उत्तर त्याला पैसा नाही, हे आहे. तो पैसा आपणच आपला निर्माण करू. म्हणजे एफडीआयसाठीच्या जाचक अटी मान्य करण्याची गरज राहणार नाही.

अर्थक्रांती तर त्याही पुढे जाऊन आजच्या अनेक प्रश्नांची उत्तरे देते. पण तो विचाराने देश आमूलाग्र बदलू शकतो, हे आर्थिक साक्षरते अभावी पटत नाही. अर्थात निष्क्रिय गुंतवणुकीकडून उत्पादक गुंतवणुकीकडे वळले पाहिजे, असे भारतीय समाजाला आज वाटायला लागले आहे तसेच अर्थक्रांतीचेही होईल. सध्याची लपवाछपवीवर आधारित असलेली आणि खोटा व्यवहार करायला लावणारी करव्यवस्था, त्यामुळे लाचार झालेले सरकार, रोखीचे व्यवहार वाढविणाऱ्या अधिक मूल्यांच्या नोटा आणि अशा अस्वच्छ व्यवस्थेचे आपल्या आयुष्यावर होणारे परिणाम सर्वसामान्य माणसाला कळतील आणि तेच शांत, प्रामाणिक, समृद्ध आणि स्वाभिमानी जीवनासाठी अर्थक्रांतीचा पुरस्कार करतील. ■